113

जिल्हा परिषदेच्या अधिनस्थ मोडकळीस
आलेल्या / धोकादायक इमारतीच्या इमारत
बांधकामाबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन पूरक परिपत्रक क्र.जिपई-२०११/प्र.क्र.१९८/पंरा-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ जून, २०१२

वाचा : १. शासन निर्णय, सा.बां.वि.क्र.जीईएन-१०८४/(२०)/इ-२, दिनांक २४मे.१९८४

२. शासन पूरक परिपत्रक,ग्रा.वि.व ज.सं.वि. क्र.जिपई-२०११/प्र.क्र.१९८/पंरा-७,दि.९जानेवारी २०१२

प्रस्तावना :

जिल्हा परिषदेच्या अधिनस्थ विविध प्रशासकीय विभागाच्या, विविध योजनांच्या निधीतून प्रशासकीय बांधकाम हाती घेण्यात आलेले असुन कालौघात काही इमारतींची बांधकामे जीर्ण होऊन मोडकळीस आलेली आहेत. मात्र, अशी बांधकामे पाडण्यासंबधात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम तसेच ग्रामपंचायत अधिनियमात स्पष्ट तरतुद नसल्याने, त्या ठिकाणी नविन बांधकाम हाती घेण्याच्या दृष्टीने अस्तित्वातील बांधकाम पाडण्याबाबत अडचणी निर्माण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आल्याने, अस्तित्वातील मोडकळीस आलेले/ धोकादायक झालेले इमारत बांधकाम पाडण्यासंबधातील सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भीय दिनांक ९जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आहेत. मात्र, त्यानुसार कार्यवाही करताना संदर्भीय दिनांक २४मे,१९८४ च्या शासन निर्णयासोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.१, नियम-११४ खाली प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्ती/अधिकारांचे अनुपालन क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडुन करण्यात येत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

२ यास्तव, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.१, नियम-११४ खाली प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्ती/अधिकारानुसार रुपये १०.०० लाखाच्या पुस्तकी मुल्यापर्यंत प्रादेशिक कार्यालय प्रमुख व रुपये २०.०० लाखाच्या पुस्तकी मुल्यांपर्यंत विभाग प्रमुख यांनी अस्तित्वातील मोडकळीस आलेले/ धोकादायक झालेले इमारत बांधकाम पाडण्या संबधातील प्रस्तावास संदर्भीय दिनांक ९जानेवारी,२०१२ च्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे अनुपालन करुन मान्यता देण्याची कार्यवाही करावी. रुपये २०.००लाखाच्या पुढील पुस्तकी मुल्यांपर्यंतचे अस्तित्वातील मोडकळीस आलेले/ धोकादायक झालेले इमारत बांधकाम पाडण्या संबधातील प्रस्ताव व संदर्भीय शासन परिपत्रकातील अ.क्र. (viii) येथील प्रस्ताव विहीत कार्यपध्दती अनुसरुन शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

३. प्रस्तुतचे शासन पूरक परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२०६०८१००९५०१२०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( चंद्रकांत ह. वडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

जा. क्र. जिप उ/बां/रेपि-मा/12
जिल्हा परिषद उस्मानाबाद
बांधकाम विभाग
दि 13/06/12

कृ.मा.प.

प्रत माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव
(१) सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद, उस्मानाबाद
(२) उप अभियंता (बां) जि.प. उपविभाग
(३) प्रस्तुत कार्यालयातील